कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२३-२४/१२९५
दि.१४/०९/ २०२३

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीची ५४ वी मराठी 'ब' गट नाट्यस्पर्धा दि.२३ ऑक्टोबर २०२३ पासून सुरू होत असून यंदाच्या स्पर्धेत एकूण १३ नाट्यसंस्था सहभागी झाल्या आहेत. ही स्पर्धा रविंद्र भवन, साखळी यांच्या सहकार्याने पं. मनोहरबुवा शिरगांवकर नाटयगृहात, रोज सायं. ७.०० वाजल्यापासून दि. ०९ नोव्हेंबर २०२३ पर्यंत चालणार आहे.

स्पर्धेच्या नियोजित कार्यक्रमानुसार दि.२३ ऑक्टोबर २०२३ रोजी **श्री विठ्ठल मंच सांगाती, कारापूर तिस्क-साखळी** या संस्थेच्या सिध्दांत सदानंद खांडेकार लिखित **"मृत आत्मा"** या नाटकाच्या सादरीकरणाने प्रारंभ होत असून दि. २५ ऑक्टोबर रोजी युवराज पाटील यानी लिहिलेले **"स्वराज्य धर्म"** हे नाटक **श्री महालक्ष्मी युवक संघ, तळावली-फोंडा** ही संस्था सादर करणार आहे. **श्री केलंबिका कला मंच, मुळगांव-डिचोली** या संस्थेच्या वतीने रत्नाकर मतकरी लिखित **"आरण्यक"** हे नाटक दि. २६ ऑक्टोबर रोजी होईल. भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांच्या लेखणीतून साकार झालेले **"करीन ती पूर्व"** हे नाटक दि. २७ ऑक्टोबर रोजी **शिव प्रतिष्ठान नाटयमंडळ, विर्नोडा-पेडणे** ही संस्था सादर करेल तर दि.३० ऑक्टोबर रोजी रणजीत देसाई यांच्या लेखणीतून साकार झालेले **"रामशास्त्री"** हे नाटक **शिवम स्पोर्टस आणि कल्चरल क्लब हळर्ण-पेडणे** ही संस्था सादर करणार आहे. दि.३१ ऑक्टोबर रोजी शफाहत खान यांच्या लेखणीतून उतरलेले **"राहिले दूर घर माझे"** या नाटकाचा प्रयोग **कलाकार कला मंच, मयडे-बार्देश** ही संस्था सादर करणार आहे.

**प्रेरणा थिएटर्स सडा-मुरगांव** ही संस्था श्रीकांत कासकर यांच्या लेखणीतून साकार झालेल्या **"ही तरुणाई"** हे नाटक दि.०१ नोव्हेंबर २०२३ रोजी सादर करेल. दि.०२ नोव्हेंबर रोजी **युवा प्रभात सामाजिक सांस्कृतिक क्लब, मडगांव** ही संस्था विठ्ठल नागेश गावडे लिखित **"शूरवीर बाजीप्रभू"** हे नाटक सादर करणार असून दि. ०३ नोव्हेंबर रोजी प्रा. मधुकर तोरडमल यानी लिहिलेले **"मगरमिठी"** हे नाटक **श्री पांडुरंग प्रासादिक नाटय मंडळ, विठ्ठलापुर-सांखळी** ही संस्था सादर करणार आहे. **ॐ कलासृष्टी-फोंडा** या संस्थेच्या वतीने महाबळेश्वर रेडकर लिखित **"तो मृत्युंजय एक"** हे नाटक दि.०४ नोव्हेंबर रोजी होईल. राजेंद्र पोळ यांच्या लेखणीतून साकार झालेले **"वारुळ"** हे नाटक दि.०६ नोव्हेंबर रोजी **वेदांत एंटटेनमेंट, वाळपई** ही संस्था सादर करेल तर दि. ०७ नोव्हेंबर रोजी अविनाश नाईक यांनी लिहिलेले **"कृष्णविवर"** या नाटकाचा प्रयोग **सियावर राम, गिमोणे, पिळगाव-डिचोली** ही संस्था सादर करणार आहे. तर दि.०८ नोव्हेंबर रोजी स्पर्धेचा समारोप **कालिका थिएटर्स्, कळंगुट** या संस्थेच्या शंकर नारायण नवरे यांनी लिहिलेले **"सूर राहू दे"** या नाटकाने होणार आहे.

स्पर्धेतील सर्व नाटयप्रयोग रोज सायं.७.०० वाजता रविंद्र भवन, साखळी येथे होणार असून रु.५०/-च्या प्रवेशिका रविंद्र भवन, साखळीच्या तिकिट काऊंटरवर उपलब्ध असतील याची नाटय रसिकांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळवले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसजी